क्रमांक १५८८९ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक, ऑक्टोबर, २०२१
14 OCT 2021

:: परिपत्रक ::

**विषय :- टपाल व्यवस्थेत करण्यात आलेल्या सुधारणेबाबत .......**

**संदर्भ :- (१) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१५२९/ग-१, दिनांक १ फेब्रुवारी, १९९६**
**(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.७१९९/ग-१, दिनांक ७ मार्च, २०००**
**(३) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३६५६६/ग-१, दिनांक २६ सप्टेंबर, २००१**
**(४) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२९३३९/ग-१, दिनांक २८ ऑक्टोबर, २००३**
**(५) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३२०६०६/ग-१, दिनांक १५ जुलै, २००४**
**(६) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.४९४/ग-१, दिनांक ०७ जानेवारी, २०१३**
**(७) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१९७१/ग-१, दिनांक १९ जानेवारी, २०१६.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते आहे की, या सचिवालयातील विविध कक्षातून पाठविले जाणारे बहुतांशी टपाल सायंकाळी ५.०० नंतर "ग-१" कक्षातील जावक रजिस्ट्रीमध्ये पाठविले जाते. त्यामुळे त्याच दिवशी अशा टपालांचा बटवडा करणे शक्य होत नाही. हे विचारात घेता या सचिवालयामार्फत पोस्टाने पाठवावयाचे टपाल दुपारी ४.०० वाजेपर्यंत जावक कक्षाकडे पाठविण्याच्या दृष्टिने कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना यापूर्वी परिपत्रकाव्दारे वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापि, बहुतांश कक्षाचे टपाल ५.०० ते ५.३० या वेळेत कोणतीही पूर्व सूचना न देता जावक कक्षात प्राप्त होते. त्यामधील काही पत्रे दुस-या दिवशी विधानभवन मध्ये बैठक आयोजित केल्याबाबतची असतात.अर्थात सदरील पत्रे ताबडतोब संबंधितांना पाठविणे आवश्यक असते व तशा सुचनाही सबंधित कक्षाकडून "ग-१" कक्षास देण्यात येतात. परंतु संबंधित कक्षाकडून ज्या मंत्रालयीन विभागांना पत्र पाठवावयाची आहेत, त्यांना पत्रे स्विकारण्याबाबत दुरध्वनीवरुन कोणतीही पूर्वसूचना देण्यात येत नाही. त्यामुळे मंत्रालयात टपाल घेवून गेलेल्या कर्मचा-यास टपाल स्वीकारण्यास तेथील कक्षात कोणीही कर्मचारी नसल्याने सदरील टपाल परत घेवून यावे लागते. अशावेळी बैठकीची पत्रे विभागाल प्राप्त न झाल्याने त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी "ग-१" कक्षावर येते. याबाबत उक्त परिपत्रकान्वये सर्व कक्षांना कळवूनही अद्याप बहुतांश कक्षाकडून त्याची अमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

..२/-